दिनांक १९/०७/२०२२

## प्रसिध्दी पत्रक

**आ.लो.से. श्री. कैलास तुकाराम जाधव, वय 57 वर्षे, पद- सहाय्यक गटविकास अधिकारी, अतिरीक्त कार्यभार गटविकास अधिकारी, पंचायत समिती वैजापुर जिल्हा औरंगाबाद ( वर्ग- 2) यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.15000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.**

| | | |
|---|---|---|
| ाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| न्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे वैजापुर औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| ा.लो.से यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. कैलास तुकाराम जाधव, वय 57 वर्षे, पद- सहाय्यक गटविकास अधिकारी, अतिरीक्त कार्यभार गटविकास अधिकारी, पंचायत समिती वैजापुर जिल्हा औरंगाबाद ( वर्ग- 2) रा. न्यू हनुमाननगर सिडको औरंगाबाद. |
| ाच मागणी रक्कम | :- | 20,000/- रुपये |
| ाच स्विकृती रक्कम | :- | 15,000/-रुपये |
| ास अधिकारी | :- | श्री. दिलीप साबळे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| ाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुदान मंजुर करण्यासाठी. |
| ाडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे शेतात मोहगणी वृक्ष लागवड करण्याकरिता रोजगार हमी योजने अंतर्गत अनुदान मंजुर करण्यासाठी आ.लो.से. श्री. कैलास जाधव हे लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय औरंगाबाद येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, आ.लो.से. श्री. कैलास जाधव यांनी लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 19/07/2022 रोजी पंचायत समिती कार्यालय वैजापुर परिसरात सापळा आयोजीत केला असता पंच साक्षीदारासमक्ष तडजोडीअंती लाचेची रक्कम 15000/- रुपये पंचायत समिती कार्यालय वैजापुर येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. श्री. कैलास जाधव यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. वैजापुर औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. दिलीप साबळे, यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोअं भिमराव जिवडे, दिगंबर पाठक, चालक- सोमीनाथ थिटे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189.

पोलीस उप अधिक्षक कार्यालय लाचलुचपत ब्युरो औरंगाबाद सत्यमेव जयते

**(मारुती पंडीत)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**